
Juni Khyat ISSN: 2278-4632
(UGC Care Group I Listed Journal) Vol-10 Issue-5 No. 2 January–December 2020


# उत्तर पेशवे कालीन नाना फडणविसांचे योगदान : एक चिकित्सा

**डॉ . संजय तुकाराम वाघमारे**
इतिहास विभाग प्रमुख
शंकरराव मोहिते महाविद्यालय, अकलूज
Email- drsanjaywaghmare7099@gmail.com
मो. नं.- ९३५९५९४८८०

**बाळाजी जनार्दन भानु - नाना फडणवीस**



**हस्तलिखित**



**प्रास्ताविक :**

भारताच्या मध्ययुगीन इतिहासामध्ये दक्षिण भारतात १७ व्या शतकात स्थापन झालेली मराठी सत्ता अधांतच शिवछत्रपतींच्या अथक परिश्रमामधून आणि प्रेरणेतून निर्माण झालले स्वराज्य हे फार महत्वाचे ठरते. ही घटना हिंदुस्थानातील तमाम सत्ताधिशांना व परदेशातील सत्तांनाही वर्षानुवर्षे प्रेरणास्त्रोत देणारी आहे. न भूतो न भविष्यती असे हे मराठ्यांचे राज्य

स्थापन केले . शिवाजी महाराज यांनी छत्रपती संभाजी महाराज व त्यानंतर छत्रपती राजाराम महाराज, महाराणी ताराबाई यांनी अनेक संकटांशी सामना करीत हे राज्य बादशहा औरंगजेबच्या आक्रमणातून सुरक्षित ठेवले. बादशहाच्या मृत्यु नंतर इ . स . १७०७ ह छत्रपती शाहू हे मराठ्यांचे राज्य सातारा येथून पाहू लागले . छत्रपती शाहूंनी आपल्या अष्टप्रधान मंत्री मंडळातील पेशव्यांना जास्त महत्त्वाचे स्थान देऊन त्यांच्यावर राज्याची जबाबदारी सोपवली. पेशवे कालखंड सुरू झाला. इ. स. १७१३ ते इ.स. १७६१ पर्यंत क्रमाने पराक्रमांची शर्थ करून मराठी राज्याचा भगवा उत्तरेकडे फडकविणारे पेशवे बाळाजी विश्वनाथ,थोरले बाजीराव, बाळाजी

 Copyright © 2020 Authors

बाजीराव उर्फ नानासाहेब हे इतिहासात अजरामर ठरले. इ.स.१७६१ नंतर उत्तर पेशवाई सुरू झाली. पानिपताच्या आघातानंतर थोरले माधवराव पेश गादीवर आले. त्यांच्याच काळात व नंतरही नाना फडणवीस यानी मराठे शाहीची प्रामाणिक सेवा केली . त्यानी विविध क्षेत्रात चागले कार्य करून मरठेशाही इग्रजासारख्या पाश्चात्य शत्रूपासून व भारतातील शत्रुपासून वाचवली . म्हणून उत्तर पेशवेकालीन इतिहासात मोलाचे स्थान नाना फडणवीस यांना आहे .

**१ ) नाना फडणवीसांचे पूर्व चरित्र :**

नाना फडणवीसांचा जन्म २२ फेब्रुवारी १७४२ रोजी सातारा येथे झाला . त्यांच्या घराण्यात पेशवाईचा वंश परंपरांतर्गत फडणवीशी होती . राघोबाच्या उत्तर स्वारीच्या वेळी नानांचे वडील बाबूराव मरण पावले त्यामुळे वयाच्या १४ व्या वर्षी नानांना फडणवीशीची वस्त्रे मिळाली. नशीब काढण्यासाठी आलेले नाना अगदी खालच्या घरातून स्वतःच्या बुध्दीच्या बळावर मराठी सत्तेतील सर्वश्रेष्ठ पदावर जाऊन पोहोचले . पानिपत युध्दातून पळून आल्यानंतर मराठी सत्तेचे नानांनी संरक्षण केले . नाना तलवारबहाद्दूर नसून बुध्दिबहाद्दूर होते . त्यांच्या मुत्सद्दीपणाचे व लेखणीचे इंग्रजांनी कौतुक केले ; परंतु नानांचे खसगी जीवन वाईट होते . ते संपत्तीचे लोभी होते . त्यांनी एकूण ९ बायका केल्या. मृत्युसमयी त्यांची शेवटची बायको ९ वर्षाची होती . १३ मार्च,१८०० रोजी वयाच्या ५८ व्या वर्षी नाना फडणवीस मरण पावले . ज्या नाना फडणीस यांनो सवाई माधवरावांच्या मृत्यूनंतर २० बर्ष पेशवाईचा गाडा उत्तम रीतीने सांभाळला . त्या नानांचे कौतुक त्यांच्या मृत्युनंतर ही केले आहे . जेंव्हा छत्रपती ही नामधारी होते आणि पेशवे ही नामधारी होते त्या वेळी म्हणजे बारभाई कारस्थानाच्या काळात मराठा मंडळाला संघटित करून मराठी राज्याची धुरा नानाने यशस्वीपणे सांभाळली .पहिले पेशवे बाळाजी विश्वनाथ यांच्या बरोबर कोकणातून देशावर आले होते. त्या मध्ये नानाचे पूर्वज होते . जेव्हा बाळाजी विश्वनाथ सिध्दी कडून वाटेत कैद झाले होते . तेंव्हा त्यांच्या सुटकेसाठी भट बंधू प्रमाणेच भान बंधुनीही मदत केली होती . त्याचवेळी बालजींनी भानु बंधूना असा शब्द दिला होता की, आपण देशावर जे मिळवू त्याचा चौथा हिस्सा तुम्हास देवू . हा शब्द बाळाजींनी पाळला व पेशवे पदावर आल्यावर त्याने फडणीस खाते सुरू केले . व त्यावर भानुंची नेमणूक केली . त्यामुळे कालांतराने भानु हे नाव मागे पडले व फडणीस हे नाव रूढ झाले . नाना हे या फडणीस घराण्याचे वारस. पानिपतच्या मोठ्या युद्धानंतर थोरले माधवराव वयाच्या १७ व्या वर्षी पेशवे बनले . यावेळी नाना फडणीसांचेवय १९ वर्षाचे होते . नाना पेशव्यांचे सल्लागार म्हणून काम पाहू लागले . या काळात आणि थोरल्या माधवरावांच्या अकाली निधनानंतर नाना फडणीसांचे न्यायालयीन योगदान मराठी राज्याच्या न्यायव्यवस्थेचे महत्व वाढवणारे ठरले . न्यायदानाची जी चौकट स्वराज्यात उभी करण्यात आली होती त्या चौकटीत राहून नानांनी विविध खटले सोडविले होते .

नानांना माधवरावांच्या निधनानंतर चांगली संधी मिळाली होती . नारायणराव पेशवे होणे व अवघ्या ८ महिन्यात त्यांचा शनिवारवाड्यात भर दिवस खून होणे या घटनामुळे सर्व निर्णय नानाच घेऊ लागले . १८ एप्रिल १७७४ ला पेशवे नारायणरावांची पत्नी

 Copyright ⓒ 2020 Authors

गंगाबाई हिने एका मुलास जन्म दिला . तोच मुलगा सवाई माधवराव म्हणून पुढे प्रसिद्ध झाला . याच काळात पुण्याची सर्व सत्ता आपल्या हाती केंद्रित करण्याची हालचाल नाना करू लागले . त्या मध्ये ते यशस्वी झाले . इ.स .१७७४ ते १७९५ या २० वर्षात नाना हे पेशवाईचे सर्वेसर्वा बनले होते . अशा या नानांचे न्यायदानातील कार्य पाहू यात .

*** नाना फडणविसांची कामगिरी :**

**१)बारभाईचे कारस्थान आणि नाना फडणवीस** : बारभाई ऑक्टोबर इ . स .१७७२ मध्ये एकत्र आले व पुढे वर्ष दीड वर्ष एकत्र येण्याचा प्रचार उस्फुर्त व अनौपचारिक होता . सखारामबापू व नाना फडणवीस यांनी त्याला कायदेशीर स्वरूप दिले . नाना फडणवीसांना पेशव्यांच्या राजकारणात दुय्यम स्थान होते . प्रथम स्थानप्राप्तीसाठी मंडळाचा आधर घेतला. बारभाईसमोरील मुख्य अडचण म्हणजे वारसाचा प्रश्न होता . नारायणरावाचा खुनी राघोबादादा याला पेशवेपद देऊ नये यासाठी बारभाईनी प्रयत्न केले .

**२ ) मोरोबादादाचे कारस्थान आणि नाना फडणविसांची भूमिका** : नान फडणवीसांनी पुणे दरबारात फ्रेंचांना जादा महत्त्व दिल्याने इंग्रजांना चीड आली त्यांनी राघोबाला पेशवेपदावर बसविण्याचा चंग बांधला . पुण्यातील इंग्रज वकील मोस्टीन यांच्या मार्फत पुणे दरबारतोल्न सर्व माहिती प्राप्त केली . नाना,सखारामबाप यांच्या व्यक्तिमत्वापुढे इतर सर्वजण निशभ्र टरले . नाना हेच खरे सत्ताधिश बनले . थोरले माधवराव पेशवे यांचा सचिव मोरोबा हा नानापुढे शून्य ठरला याचे दुःख मोरोबाला होते. तो नानाचा वंश, मत्सर करीत असे . इंग्रजांनी मोरोबाला हाताशी धरून कट कारस्थाने रचली .

**३ ) नाना फडणवीस व सखाराम बापू संबंध:** नानांनी आपल्या मुत्सद्धिगिरीने हैरान करून पुणे दरबारी आपले बस्तान बसविले . पुरंदरच्या तहापर्यंत नाना - सखारामबापूचे धिमे धोरण नानांना पसंत नव्हते . बारभाईची सत्ता दोघंच्या हाती होती. परंतु सत्ता एकाच्या हाती असल्याशिवाय राज्य कारभार सुरक्षित राहणार नाहीत . त्यावरून स्पर्धा सुरू झाली . त्यात नानांनी सर्व सुत्रे आपल्या हाती घेतली .

**४ ) नाना व महादजी संबंध** : सालभाईच्या तहानंतर महादजी उत्तरेकडे गेले . त्यांना बादशहाने बकोल - ई - मुतालीक म्हणून कारभार पद दिले यामुळे नानाच्या मनात शंका निर्माण झाली की, महादजी उत्तरेत स्वतंत्र राज्य निर्माण करणार त्यामुळे नानांनी उत्तर मोहिमेसाठी महादजींना पैसा व लष्करी मदत म्हणून पुरविल्ने नाही . इंग्रज - मराठा पहिल्या युध्दाच्या वेळी हैदरला विचारात न घेता मराठ्यांनी इंग्रजांच्या बरोबर तह केला . त्यामुळे टिपू सुलतान मराठे - इंग्रज यावर रागावला, तर नाना महादजीवर रागावले . यातून वाद निर्माण झाला .

**५ ) नाना - टिपू सुलतान संघर्ष** : सालभाईचा तह करून मराठ्यांनी हैदरचा विश्वासघात केल्याने टिपूने मंगलोरचा तहा केला . मराठ्यांशी संघर्षाची मशाल पेटविली . मराठ्यांनी रायचूर दुआबाकी प्रदेशावर हल्ला चढविला . नानांनी हरिपंत फडकेच्या नेतृत्वाखाली फौज पाठवून सहर्ष सुरू केला . टिमूने गजेंद्रगड येथे तह केला .

 Copyright © 2020 Authors

**६ ) नाना व निजाम संघर्ष** : - बाळाजी विश्वनाथापासून निजामाशी संघर्ष सुरू होता . परंतु माधवराव पेशव्यांनी राक्षस भवनच्या लढाईत इ . स . १७६३ सालो पराभव केला . तेव्हापासून मैत्रीच संबंध होते सालभाईच्या तहानंतर संबंध दुरावले . १५ मार्च १७ ९ ५ रोजी खरड्याची लढाई झाली . त्यात निजामाचा पराभव झाला . .. 3

**७ ) नाना - दुसरा बाजीराव संबंध** : - सवाई माधवरावांच्या नंतर दुसरा बाजीराव यास पेशवाईची वस्त्रे मिळाली . यामध्ये नानांचाही पुढाकार होता . पण नाना- दुसरा बाजीराब हे एकमेकांचे शत्रू बनले होते . बाजीरावांना नानांची अडचण वाटू लागल्याने त्याचा काटा काढण्याचे ठरविले . त्यामुळे नानांनी सातारला पळ काढला . चिमाजीला पेशवेपदाची वस्त्रो देण्याचा कट नागांनी रचला . शेवटी नानांची दुसऱ्या बाजीरावांना ४ डिसेंबर १७१६ रोजी पेशवे पद दिले .

**८ ) नानांचे न्यायदान** : नानांच्या कर्तबगारीला खऱ्या अर्थाने सुरूवात झाली ती थोरल्या माधवरावाच्या मृत्युनंतर कारण माधवरावांच्या इच्छेनुसार त्यांचे धाकटे बंधु नारायणराव हे १३ डिसेंबर १७७२ रोजी पेशवे म्हणून गादीवर आले . नारायणरावांचे वय फार लहान म्हणजे १७ वर्षाचे होते . अवघ्या ८ महिन्यात त्यांचा खून झाला . यानंतरचा काळ बारभाई कारस्थानाचा होता. या काळातच नानांना प्रशासनाबरोवर राज्याच्या इतर ही आघाड्या सांभाळाव्या लागल्या . विशेषतः न्यायदानात त्यांना अनेक निर्णय कठोर पणे घ्यावे लागले . त्यांचे हे न्यायालयीन निर्णय त्या काळाचा विचार करता क्रतीकारक म्हणावे लागतील .

* **नाना फडणविसांचा शेवट :** उत्तर पेशवीय काळखंडामध्ये नानांनी राज्यकारभाराचे घडी बसविण्याचा प्रयत्न केला . पण नानांची सत्य प्रियता शिस्त, करारीपणा, व त्यांचे लोकावर असलेले वजन बाजीरावास सहन होईना म्हणून त्याने नानांना अटक केली व सर्व मिळकती जप्त केल्या . पण त्यांच्या शिवाय काहीच चालेना म्हणून पुन्हा सुटका केली . राज्याच्या विवंचनेमुळे नाना अत्यत श्रमले होते. थकले होते. त्यात बाजीरावाने त्यांना दिलेल्या वाईट वर्तणुकीमुळे नाना उद्दिग्न व कष्टी झाल्ने . १७९९ मध्ये त्यांना ज्वर येऊ लागला आणि त्यातच शेवटी गुरुवार दि .१३ मार्च १८०० रोजो अडीच प्रहर रात्री या अत्यंत परोपकारी स्वामी निष्ठ थोर राष्ट्रभक्त व अत्यंत बुध्दिमान मुत्सद्याने पुणे येथे स्वतःच राहत्या वाड्यात इहलोकाची यात्रा संपविली . दहा सहस्त्रलोक व सर्व मुत्सद्दी जमा जहाले होते . कर्नल पामर म्हणतात, मराठी राज्याचे शहाणपण व समतोलपणा नानाबरोबर लयास गेला.बाळकोबा तात्या सर्वांचे छत्र गले.राज्यातील दब ब नेट गेला .

* **निष्कर्ष :** नाना फडणविसांनी अनेक लोकोपयोगी कामे केली . ते उत्कृष्ट प्रशासक होते . त्यांनी उत्तम कर व्यवस्था निर्माग केली . पेशवाईत त्यांचा इतका कुशल करभारी झाला नाही . मात्र नानाच्या वैयक्तिक जीवनविषयी इतिहासकारांच्या मनात आदर नाही . त्यांनी अनेक विवाह केले . राज्यात हेर पेरून अचुक माहिती मिळवून यशस्वी राज्य कारभार करण्याचा प्रयत्न केला .

**संदर्भ :-**

 Copyright ⓒ 2020 Authors

1. भारतीय संस्कृतिकोश - ५ वा खंड संपादक पं . महादेवशास्त्री जोशो - सहसंपादक तर्कतीर्थ सो . पद्मजा होडारकर भारतीय संस्कृतिकोश मडळ ४१० शनिवार पेठ पुणे ४११०३० इ.स.२००१पृष्ठ ६७१
2. नाना फडणीस आणि मराठी राज्य प्रशासन डॉ . मधुकर कुलकर्णी , प्रकाश मुद्णालय पुणे , २००४ प्रथम आवृत्ती पृष्ठ ९
3. डॉ . सुहासिनी इर्लेकर , ' नाना फडणवीसांचे आत्मचरित्र ' पद्मगंधा प्रकाशन ,प्रथमावृत्ती २५ मार्च २०१०
4. डॉ . दीपा दिनेश सावळे , मराठ्यांचा इतिहास , एज्युकेशनल पब्लिशर्स अॅण्ड डिस्ट्रिब्युटर्स आवृत्ती जून २०१३
5. एन . डी . पाटोल , डी . एस . थोरात ,विश्वनाथ पवार ,अभय पाटोल ' मराठी सत्तेचा विस्तार व ऱ्हास ' ,फडके प्रकाशन , आवृत्ती २०१५
6. अखेरचा पेशवा : - डॉ . सुमन वैद्य - प्रकाशक प्रगती प्रकाशन ८७ अ धंतोली , नागपूर ४४००१२ प्रथमावृत्ती १४ जाने. १९९४ पृष्ठ १४,१५
7. पेशवे घराण्याचा इतिहास - प्रमोद ओक कॉन्टिनेन्टल प्रकाशन विजयानगर , पुणे ३० इ .स . २००१३ री आवृत्ती पृष्ठ १२८
8. Zew News, १३ March २०१९
9. https : // bharatdiscovery ory.india 5

 Copyright © 2020 Authors